Vol 7 Issue 2 Nov 2017
ISSN No : 2249-894X

Monthly Multidisciplinary Research Journal

# Review Of Research Journal

Chief Editors

Ashok Yakkaldevi
A R Burla College, India

Ecaterina Patrascu
Spiru Haret University, Bucharest

Kamani Perera
Regional Centre For Strategic Studies, Sri Lanka

**Welcome to Review Of Research**

**RNI MAHMUL/2011/38595** **ISSN No.2249-894X**

Review Of Research Journal is a multidisciplinary research journal, published monthly in English, Hindi & Marathi Language. All research papers submitted to the journal will be double - blind peer reviewed referred by members of the editorial Board readers will include investigator in universities, research institutes government and industry with research interest in the general subjects.

**Regional Editor**

Dr. T. Manichander

Sanjeev Kumar Mishra

***Advisory Board***

Kamani Perera
Regional Centre For Strategic Studies, Sri Lanka

Ecaterina Patrascu
Spiru Haret University, Bucharest

Fabricio Moraes de AlmeidaFederal University of Rondonia, Brazil

Anna Maria Constantinovici
AL. I. Cuza University, Romania

Romona Mihaila
Spiru Haret University, Romania

Delia Serbescu
Spiru Haret University, Bucharest, Romania

Xiaohua Yang
University of San Francisco, San Francisco

Karina Xavier
Massachusetts Institute of Technology (MIT), USA

May Hongmei Gao
Kennesaw State University, USA

Marc Fetscherin
Rollins College, USA

Liu Chen
Beijing Foreign Studies University, China

Mabel Miao
Center for China and Globalization, China

Ruth Wolf
University Walla, Israel

Jie Hao
University of Sydney, Australia

Pei-Shan Kao Andrea
University of Essex, United Kingdom

Loredana Bosca
Spiru Haret University, Romania

Ilie Pintea
Spiru Haret University, Romania

Mahdi Moharrampour
Islamic Azad University buinzahra Branch, Qazvin, Iran

Titus Pop
PhD, Partium Christian University, Oradea,
Romania

J. K. VIJAYAKUMAR
King Abdullah University of Science & Technology,Saudi Arabia.

George - Calin SERITAN
Postdoctoral Researcher
Faculty of Philosophy and Socio-Political Sciences
Al. I. Cuza University, Iasi

REZA KAFIPOUR
Shiraz University of Medical Sciences
Shiraz, Iran

Rajendra Shendge
Director, B.C.U.D. Solapur University, Solapur

Awadhesh Kumar Shirotriya

Nimita Khanna
Director, Isara Institute of Management, New Delhi

Salve R. N.
Department of Sociology, Shivaji University, Kolhapur

P. Malyadri
Government Degree College, Tandur, A.P.

S. D. Sindkhedkar
PSGVP Mandal's Arts, Science and Commerce College, Shahada [ M.S. ]

Anurag Misra
DBS College, Kanpur

C. D. Balaji
Panimalar Engineering College, Chennai

Bhavana vivek patole
PhD, Elphinstone college mumbai-32

Awadhesh Kumar Shirotriya
Secretary, Play India Play (Trust),Meerut (U.P.)

Govind P. Shinde
Bharati Vidyapeeth School of Distance Education Center, Navi Mumbai

Sonal Singh
Vikram University, Ujjain

Jayashree Patil-Dake
MBA Department of Badruka College Commerce and Arts Post Graduate Centre (BCCAPGC),Kachiguda, Hyderabad

Maj. Dr. S. Bakhtiar Choudhary
Director,Hyderabad AP India.

AR. SARAVANAKUMARALAGAPPA UNIVERSITY, KARAIKUDI,TN

V.MAHALAKSHMI
Dean, Panimalar Engineering College

S.KANNAN
Ph.D , Annamalai University

Kanwar Dinesh Singh
Dept.English, Government Postgraduate College , solan

More.........

**Address:-Ashok Yakkaldevi 258/34, Raviwar Peth, Solapur - 413 005 Maharashtra, India**
**Cell : 9595 359 435, Ph No: 02172372010 Email: ayisrj@yahoo.in Website: www.oldror.lbp.world**

REVIEW OF RESEARCH
ISSN: 2249-894X
IMPACT FACTOR : 5.2331(UIF)
VOLUME - 7 | ISSUE - 2 | NOVEMBER - 2017

# पु.ल.देशपांडे यांचे व्यक्तिचित्र लेखन




**Anil G. Mungle**
PHD Research Scholar, Tilak Maharashtra Vidyapeeth.

***प्रस्तावना :***

पु.ल.देशपांडे यांच्या साहित्याचा अभ्यास करताना एक गोष्ट प्रकर्षाने लक्षात येते, ती म्हणजे त्यांचे सर्वार्थाने असणारे माणसांवरील प्रेम. लहान-थोर, सामान्य-असामान्य, श्रीमंत-गरिब असा कोणताही स्तरभेद न उद्‌भवता मनातील कणवेमुळे त्यांनी आयुष्यभर माणसे आणि माणसेच जोडण्यात, निरखण्यात व चितारण्यात धन्यता मानली. त्यांचा पिंडच गर्दीची, माणसांची, मित्र परिवाराची असोशी उराशी घेऊन बनला होता. विविध भाषा व ती बोलणारी विविध प्रांतातील, विविध स्तरातील, व्यवसायातील आजुबाजूची असंख्य माणसं, त्यांचे स्वभाव आणि उद्योग यांचे अखंड निरीक्षण व त्यातील संगती-विसंगतीचे चित्रण ह्याचे आकर्षण पुलंना पहिल्यापासून असलेले प्रामुख्याने लक्षात येते. सुनीताबाई देशपांडे म्हणतात, ''त्याला माणसे हवी. त्यासाठी त्याच्या माझ्यासारख्या कोणत्याही अटी नसतात. निवड नसते.'' (देशपांडे, सुनीता, आहे मनोहर तरी., पृ.९६) हे खरेच आहे. वयाची, जातीची किंवा रूढार्थानी येणाऱ्या कोणत्याही मर्यादा न जुमानता समान आवडीच्या साहित्य, संगीत, विनोद, नाटक, सिनेमा, गप्पा या विषयातील शेकडो सुजनांशी पुलंचे मैत्र होते. चार मित्रांना जमवून छान गाणे ऐकावे, म्हणावे, गप्पा माराव्यात, हास्यविनोद करावेत ही त्यांची श्वासाइतकी आवश्यक व आवडीची गोष्ट होती. माणसांचा गोतावळा हीच प्रेरणाशक्ती असावी इतका त्याचा सोस होता.

सतत नवीन जागा, नवीन गाव, नवीन नोकरी, नवीन व्यवसाय आणि नवनवीन मित्रगण असा त्यांचा प्रवास आपल्याला दिसतो. त्यात राजकीय व सामाजिक क्षेत्रातील नामवंत गवई, चित्रकार, शिल्पकार, नट, लेखक, नाटककार असे अनंत वैविध्याचे गणगोत त्यांच्याभोवती जमले. या माणसांच्या प्रेमातून तसेच आकर्षणातून पुलंना 'व्यक्तिचित्रे' ह्या साहित्यप्रकाराचा सर्वात जास्त ओढा वाटला असावा.

सूक्ष्म निरीक्षण शक्ती, खोडकर स्वभाव, विनोदी वृत्ती आणि माणसांबद्दलची ओढ यातून अगदी १९४२ सालापासून म्हणजेच वयाच्या तेवीस चोविसाव्या वर्षापासून साहित्यातील 'व्यक्तिचित्र' हा आकृतिबंध त्यांनी आपलासा केलेला दिसतो. 'भय्या नागपूरकर' या शीर्षकाचे पहिले व्यक्तिचित्र १९४४ साली 'अभिरूची या बडोद्याहून प्रकाशित होणाऱ्या मासिकात प्रसिद्ध झाले. त्यानंतर 'व्यक्ती आणि वल्ली' (प.आ.१९६२.), 'गणगोत' (प.आ.१९६६.), 'गुण गाईन आवडी' (प.आ.एप्रिल १९७५), 'मैत्र' (प.आ.एप्रिल,१९८९.) आणि आपुलकी (प.आ.नोव्हेंबर १९९८.) असे त्यांचे पाच व्यक्तिचित्रांचे संग्रह प्रसिद्ध झाले व सर्व मिळून एकूण ८४ व्यक्तिचित्रे प्रसिद्ध झाली. याशिवाय 'दाद' (प.आ.१९९७) पुस्तकातही प्रसंगोपात्त लिहिलेली आणखी सहा व्यक्तिचित्रे आढळतात.

रूढार्थानी सामान्य वा असामान्य माणसांचे जीवन व त्यातील प्रश्न, अडचणी, गुंतागुंत, घटना, भयगंड, न्यूनगंड, छोटे मोठे अहंकार आणि त्यांच्यातील असामान्य गुण या सर्वातून वर्ण्यव्यक्तीची जडणघडण पुलंनी आपल्या मर्मज्ञ निरीक्षणातून साहित्यात सातत्याने मांडली.

पुलंच्या असामान्य लोकप्रियतेची कारणे शोधताना त्यांची विनोदवृत्ती हा महत्त्वाचा स्त्रोत असला तरी व्यक्तिचित्रांचा त्यादृष्टीने विचार करता वेगळेच सत्य हाती येते. व्यक्तिचित्रांच्या ऐन निर्मितीप्रक्रियेत पुलंनी केलेले विनोद आज जुने झालेत. तसेच त्यांचे वाङ्मयीन विडंबनांचे संदर्भही कालबाह्य वाटतात. परंतु व्यक्तिचित्रांचे संग्रह मात्र आज ७० वर्षानंतरही तडाखेबंद विक्री होत असलेले दिसतात. यावरून त्यांची व्यक्तिचित्रे सर्वात दीर्घायुषी असल्याचे दिसते. गेली सात दशकं व्यक्तिचित्रांची जादू गारूडासारखी वाचकांवर प्रभाव ठेवून त्यांना आनंद देत आहेत.

व्यक्तिचित्रे म्हटल्यावर नंदा प्रधान, अंतू बर्वा, चितळे मास्तर किंवा सखाराम गटणे हीच नावे वाचकांच्या तोंडी आजही येतात. व्यक्ती आणि वल्ली या संग्रहातील सर्वच वल्ली वास्तवात अस्तित्वात नाहीत आणि त्यातील एकही व्यक्तिचित्र विनोदी नाही. शैलीत डोकावणारा प्रसंगोपात्त व अपरिहार्य, किंचित विनोद सोडला तर पुलंचे एकही व्यक्तिचित्र विनोदी वाङ्मयात मोडणारे नाही आणि तरीही ते सर्वात दीर्घायुषी वाङ्मय म्हणून सिद्ध झालेले आहे.

नाटकातून, व्यक्तिचित्रातून, प्रवासलेखनातून, ललितलेखनातून, विडंबनलेखनातूनही त्यांनी माणसांविषयीच आत्मीयतेने लेखन केले. एकूणच आयुष्यभर पुलंना माणसांचाच सोस सतत हवाहवासा वाटत असलेला दिसतो.

मराठी वाङ्मयात एका वाङ्मय प्रकाराचे घटक दुसऱ्या वाङ्मय प्रकाराशी जुळतात. काही कथांना शब्दचित्राचे वा व्यक्तिचित्राचे स्वरूप येते. तर काही व्यक्तिचित्रे ललितनिबंधाच्या जवळ जातात.

व्यक्तिचित्रे या रूपबंधाच्या इतिहासाचा आढावा घेतला तर ए.जी.गार्डनरने त्याला 'Sketch' असे संबोधले. 'Sketch' हा शब्द चार्ल्स डिकन्सने 'शब्दचित्र' या व्यापक अर्थाने वापरला असावा. (डिकन्सकृत - Sketches by Boz' London - १९२९)

१९३९ साली वि.द.घाटे यांचा 'काही म्हातारे व एक म्हातारी' नावाचा व्यक्तिचित्रांचा संग्रह प्रसिद्ध झाला. व्यक्तिचित्र या नवीन व स्वतंत्र वाङ्मयप्रकाराला मराठीत जन्म देणारे प्रारंभीचे लेखन म्हणून या लेखनाला मान्यता मिळाली, असा उल्लेख सु.रा.चुनेकर यांनी पुस्तकाच्या संपादकीय प्रास्ताविकात केला आहे. या पुस्तकावरील अभिप्राय नोंदविताना भि.अ.परब यांनी या लेखांना 'व्यक्तिचित्रे' म्हटले आहे. (घाटे, विठ्ठलराव, काही म्हातारे व एक म्हातारी, विठ्ठलराव घाटे, प्रकाशक मौज

प्रकाशन प्र.आ.१९३९ तृतीयावृत्ती १९८८)

तर ''थोडक्यात केलेले व्यक्तिवर्णन' (एक वाङ्मय प्रकार)'' अशी व्याख्या वा.गो.आपटे यांनी केली आहे. यातील स्वभावचित्राचा वाङ्मय प्रकार म्हणून उल्लेख केल्याने तो महत्त्वाचा आहे. (संदर्भ : वा.गो.आपटे (संपा.) : 'मराठी शब्द रत्नाकर', पुणे - १९५३, तृ.आवृत्ती, पृ.६६८)

या व्याख्येनुसार 'एखाद्या व्यक्तिमत्वाचे शारिररूपासह स्वभावाचेदेखिल थोडक्यात वर्णन' असा अर्थ लक्षात येतो. हा 'एक वाङ्मय प्रकार' आहे असे त्यांनी म्हटले आहे. त्यावरून व्यक्तिचित्रे हा स्वतंत्र वाङ्मय प्रकार आहे असे त्यांनी मानले असल्याचे लक्षात येते.

पु.ल.देशपांडे यांनीही व्यक्तिचित्राच्या संकल्पनेविषयी मार्मिक लेखन केलेले आढळते.

पु.ल.म्हणतात - ''व्यक्तिचित्राचे लेखन हे पोर्ट्रेट पेंटिंगसारखे असते. पोर्ट्रेट ज्याचा आहे त्याची आणि त्या बरोबरच तो काढणाऱ्या चित्रकाराचीही त्यातून ओळख पटावी लागते. आणि हे दर्शन नकळत घडावे लागते.''(संदर्भ : पु.ल.देशपांडे (प्रस्तावना) : 'षडज्-गांधार' - कृ.द.दीक्षित कृत, मुंबई १९६७; पृष्ठ १३)

या संक्षिप्त अवतरणातून पुलंनी व्यक्तिचित्रे या साहित्यप्रकाराची काही वैशिष्ट्ये स्पष्ट केलेली दिसतात. वर्णव्यक्तीची ओळख पटण्यासाठी तिचे अंतरंग व बहिरंग असे चित्ररेखाटन व वर्णन त्यांना अभिप्रेत असलेले दिसते. तसेच ते लेखन करणाऱ्या लेखकाचेही अदृश्य परंतु मनाचा तळ दाखविणारे चित्र त्या लेखनात व्यक्त झालेले असावे. तसेच पोर्ट्रेट म्हटल्याने चित्राचे सारे गुणधर्म त्यांना त्यात अपेक्षित आहेत.

सर्वात महत्त्वाचा आणखी एक मुद्दा येथे नोंदवायला हवा तो म्हणजे कोणतेही साहित्य हे माणूस व माणसांमधील नातेव्यवहार, परस्परसंबंध यावरच आधारित असल्याने माणूस समजून घेणे व समजावणे ही व्यक्तिचित्रांचीही प्रधान प्रेरणा मानली गेली आहे.

व्यक्तिचित्र लेखनाचे सामाजिकदृष्ट्या महत्त्व खूपच आहे. या लेखनातून, व्यक्तिपरिचयाबरोबरच ज्ञानप्राप्ती, आदर्शांची ओळख, मूल्यनिष्ठा, प्रबोधन, गुणवर्णन, कृतज्ञतादर्शन या सर्वाची ओळख होते. त्याचबरोबर आनुषंगिक फायदेही होतात. अर्थात् व्यक्तीचे अंतर्बाह्य यथार्थ दर्शन व्यक्तिचित्रात अपेक्षितही नसते व ती व्यक्तिचित्राची मर्यादाही असते. लेखक कोणत्या हेतूने व्यक्तिचित्र साकारतो त्यावर (उदा. निधनाप्रीत्यर्थ, गौरवाप्रीत्यर्थ, विशिष्ट प्रसंगाप्रीत्यर्थ) ही सीमारेषा अवलंबून असते.

### *व्यक्तिचित्रांचे प्रकार :*

वास्तवाधिष्ठित व काल्पनिक असे व्यक्तिचित्रांचे दोन प्रमुख प्रकार संभवतात.

'व्यक्तिचित्रे' हा कथात्म साहित्याचा एक उपप्रकार असल्याचा निर्देश मराठी वाङ्मय कोश (खंड४था) समीक्षा-संज्ञा समन्वयक संपादक विजया राजाध्यक्ष - यामध्ये केला आहे. काल्पनिक व वास्तवाधिष्ठित हे व्यक्तिचित्राचे प्रकार जसे अंतरंगसूचक म्हणता येतात तसेच कथासदृश, चरित्राधिष्ठीत आणि ललितनिबंधसदृश व्यक्तिचित्रे हे प्रकार स्वरूपसापेक्ष म्हणता येतील.

पुलंनी वास्तवातील तसेच व्यापक गणगोतातील असंख्य व्यक्तिचित्रे साकारलेली असताना 'व्यक्ती आणि वल्ली' संग्रहातील काल्पनिक व्यक्तिचित्रे एवढ्या मोठ्या संख्येने त्यांनी का चितारली असतील? असा प्रश्न समोर घेऊन विचार करताना स्थूल मानाने काही उत्तरे आपल्याला मिळतातच. एक शक्यता अशी दिसते की पुलंना आयुष्यभर लहान थोर, सामान्य असामान्य, श्रीमंत वा गरीब अशा सर्व भेदभावा पलीकडे एकूणच माणसांबद्दल कमालीचे कुतुहलमिश्रित प्रेम होते. सामान्यतः प्रत्येक माणूसच समाजात वावरत असताना असंख्य माणसांशी अपरिहार्यपणे जोडला जात असतो. परंतु पुलंसारखा विलक्षण निरीक्षणशक्ती लाभलेला, विसंगती टिपणारा, वैशिष्ट्य जाणवणारा, संवेदनक्षम सिद्धहस्त लेखक जेव्हा माणसांना वाचू लागतो तेव्हा व्यक्तिचित्र ह्या रूपबंधाचा आधार घेत माणसाने माणसांचे माणसांसाठी लेखन करत एक रूढार्थाने काल्पनिक परंतु सर्वात वास्तविक अशी व्यक्तिचित्रे लिहिणे अपरिहार्य होत असावे.

पुलंच्या 'व्यक्ती आणि वल्ली' या ग्रंथात समाविष्ट असणाऱ्या काल्पनिक व्यक्तिचित्रांतील व्यावसायिक, सामाजिक, आर्थिक स्तरांवरील जे वैविध्य आहे ते अभूतपूर्व आहे.

उदा. 'नामू परीट' हा साक्षात धोबीच आहे. 'सखाराम गटणे' हा विद्यार्थी आहे. 'नंदा प्रधान' ही व्यक्ती मात्र गर्भश्रीमंत-पुलंच्या भाषेत शापित गंधर्व-असली तरी पुलंचा सहाध्यायी आहे. 'बोलट' हे व्यक्तिचित्र नाटकातील एक्स्ट्रॉ म्हणून गणल्या जाणाऱ्या जनार्दन नारो शिंगणापूरकर या नटाचे आहे. 'भय्या नागपूरकर; हा पुलंचा सहाध्यायी राजबंदी व रसिक म्हणून रंगवलेला दिसतो. तर 'नाथा कामत' हा सामान्य चाकरमान्या पण चिरतरूणांचा प्रतिनिधी म्हणून रेखाटलेला आहे.

'व्यक्ती आणि वल्ली' या संग्रहात पुलंनी कथासदृश अनेक व्यक्तिचित्रे आपल्या समोर उभी केलेली दिसतात. कथेचा रूपबंध, रंजकता, संवादपेरणी, स्थलकालाचे स्वातंत्र्य या सर्व घटकांचा कल्पनेच्या अनुषंगाने स्वातंत्र्य घेत वर्ण्य व्यक्तीच्या अंतरंगाचे, बाह्यरूपाचे, स्वभावाचे आणि परस्पर नात्याचे दर्शन पुल परिपूर्णतेने घडविताना दिसतात. पुलंच्या व्यक्तिचित्रात कथासदृश लहान लहान किस्सेवजा, गोष्टी वापरलेल्या आपल्या निदर्शनास येतात.

गंगाधर पाटील म्हणतात - ''कथात्म साहित्यातील वास्तव अशा कोणत्याही स्वरूपाचे असले तरी ते मुळात विशिष्ट लेखकाने शब्दार्थातून उभारलेले एक कल्पित असते. या कल्पित वास्तवाची वाचक आपल्या वाचन प्रक्रियेत स्वतःच्या साहित्यिक ज्ञानक्षमतेच्या साहाय्याने एक अर्थात्मक, मानसिक प्रतिमा निर्माण करीत असतो.'' (गंगाधर पाटील, ''कथात्म अवकाश व प्रदेश'', अनुष्टुभ, मे-जून १९९१)

नेमका याचाच प्रत्यय आपल्याला पुलंची व्यक्तिचित्रे वाचताना येतो.

पुलंच्या काल्पनिक व्यक्तिचित्रांची कथात्म स्वरूपाबरोबरच इतर वैशिष्ट्येही दिसून येतात. पु.ल.देशपांडे नाटककार सुद्धा आहेत. त्यांच्या लेखनात संवादाचा चपखल वापर दिसतो व त्यामुळे वाचकाच्या डोळ्यासमोर तो प्रसंग उभा रहातो. पुल संभाषणामध्ये नाट्यमय संवादांचा (डायलॉग) फार प्रभावी वापर करतात. डायलॉगचा वापर उचित ठिकाणी व मर्यादित स्वरूपात केल्याने ते डायलॉग वाचून वाचक स्तिमित तर होतातच पण वारंवार वाचून त्या भाषासौंदर्याचा, अर्थाचा अनेकदा आनंद घेतो. ते डायलॉग वाचकांच्या मुखी रूळू लागतात व वाचकाचे व्यक्तिचित्राशी नाते घट्ट होत जाते.

उदा. 'चितळे मास्तर' व्यक्तिचित्रात पुल लिहितात-

हजेरी संपली की पुढल्या बाकावरच्या एखाद्या स्कॉलर मुलाला उद्देशून मास्तर विचारीत, ''हं बृहस्पती, गेल्या तासाला कुठं आलो होतो?''

''सर, इंग्लिशचा तास आहे.''

''आँ? मग भूगोलाचा तास केव्हा आहे?''

''तिसरा.''

''मग तिसऱ्या तासाला तर्खडकरांचं श्राद्ध करूया. भूगोलाची पुस्तकं काढा!''

किंवा पुढचे उदा. पहा -

''बरं, मग आता काय चहा घेणार की कॉफी?''

''तुझी सहधर्मचारिणी देईल ते घेईन. काय देत्येस ? गृहिणी सचिवःसखी मिथः प्रियशिष्या ललिते कलाविधौ- काकू फार आठवण काढत्ये गो तुझी !''

''बरी आहे प्रकृती?''

''मोतीबिंदू झालाय. बाकी मास्तराच्या घरात बायकोच्या गळ्यात काही मोत्ये पडले नाही, डोळ्यात पडली, गोपू म्हणालाय आपरेशन करायचं म्हणून. (देशपांडे, पु.ल.,'व्यक्ती आणि वल्ली' २००८, पृ.११९ व १२७.)

पुल या अशा प्रभावी संवादातून नाट्यात्मतेतील सूक्ष्मता, तरलता याचे भान तर राखतातच परंतु त्यांच्या संवादातील व्यंजकता, संवादांना असलेले ध्वनिमूल्य हे त्या व्यक्तिचित्रातील संवादघटकांना वेगळ्या परिमाणाचे गमक बहाल करतात. या संवादातील पात्रे परस्पर संभाषणाच्या वाच्यार्थातून विशिष्ट परिणाम साधतातच परंतु त्यातून ध्वनित होणारा भावार्थ त्या व्यक्तिचित्राची त्रिमितीय प्रतिमा साकार करण्यास सहाय्यभूत होतो.

वर्ण्यव्यक्तीचे व्यक्तिचित्र रेखाटताना तिच्या आजूबाजूचा परिसर, भाषा, व्यवसाय, क्वचित प्रदेशसुद्धा तसेच तिच्या अनुषंगिक येणाऱ्या इतर व्यक्तींचा परिचय करून देताना पुल त्यांच्या बारीक निरिक्षणासह भाषेचा आणि इतर तपशिलांचा अचूक वापर करतात. त्यामुळे वाचकासमोर त्या ठिकाणासह (स्थानासह), भाषेसह तो प्रसंग साकार होतो. एक नाट्यमय प्रसंग जणू समोर घडतो आहे व कथनकार त्याचे अचूक वर्णन ऐकवतो आहे, असा अनुभव येतो.

'नंदा प्रधान' मधले हे उदा. पहा... इंदू वेलणकरचा राहता वाडा तिच्या इंग्लिशखेरीज इतर सर्व गोष्टींना साजेसा होता. बोळाच्या तोंडाशी ''कल्हईवाले पेंडसे आत राहतात'' असा एक तर्जनी दाखवणारा हात काढलेला बोर्ड होता. खाली कुठल्यातरी पुणेरी बोळ संप्रदायात वाढलेल्या इब्लिस कार्ट्याने खडूने ''पण कल्हई रस्त्यात बसून काढतात.'' असे लिहिले होते. .........त्या बोळातून मी आणि नंदा जाताना ओसरीवर आणि पायऱ्यांवर बसलेल्या बायका आणि पोरे नंदाकडे माना वळवून वळवून पाहात होती. जनस्थानातून प्रभू रामचंद्राला जाताना दंडकारण्यातल्या त्या शबर स्त्रियांनी ह्याच दृष्टीने पाहिले असेल.

बोळ संपता संपता 'ज.गो.वेलणकर, रि.ए.इन्स्पेक्टर' अशी पाटी दिसली. आम्ही आत गेलो. दाराबाहेर एक दोरी लोंबकळत होती. तिच्या खाली ''ही ओढा'' अशी सूचना होती. त्याप्रमाणे 'ती' ओढली. मग आत कुठेतरी काहीतरी खणखणले आणि कडी उघडली. एका अत्यंत खत्रूड चेहऱ्याच्या पेन्शनराने कपाळावर चष्मा ठेवून आठ्या चढवीत विचारले,

''काय हवँय?''

''इंदूताई वेलणकर इथंच राहतात ना?'' मी चटकन 'इंदू'ला 'ताई' जोडून आमचे शुद्ध हेतू जाहीर केले.

''राहतात. आपण?'' हाही थेरडा नंदासारखाच तुटक बोलत होता. (देशपांडे, पु.ल., व्यक्ति आणि वल्ली, २००८, पृ.४५.)

वरील परिच्छेदातून इंदू वेलणकर, तिचे वडील, स्वतः लेखक, नंदा प्रधान या व्यक्ती तसेच तिचे रहाते बोळातील घर, घराचे वर्णन, चौघांच्या वेगवेगळ्या धाटणीच्या भाषा, स्वभाव, वेश, रंग, रूप या सर्वांचे वास्तववादी व वाचकासमोर चित्र उभे करणारे संवादात्मक नाट्य जणू साकार होते. ओसरी, पायऱ्या व त्यावरील स्त्रिया हे चित्रातील सूक्ष्म बारकावे व तपशिल भरल्यासारखे संदर्भ प्रसंगाला परिपूर्णता आणतात. तसेच अस्सल रीतीने त्या काळाचे स्मरण करून देतात. वाडा हे एक स्वतंत्र व्यक्तिमत्त्व त्या प्रसंगात उपस्थित असते. शबर स्त्रिया आणि प्रभू रामचंद्रांचा दृष्टांत त्या प्रसंगातील नेमक्या भावना जशा व्यक्त करतो तसेच पुलंना नंदा प्रधान जसा व्यक्त करावयाचा आहे नेमका तसाच साकारला जातो.

वास्तवाधिष्ठीत व्यक्तिचित्रे हा साहित्यातील बंदिस्त रूपाकार म्हटला तर काल्पनिक व्यक्तिचित्रे हा त्या मानाने बराच लवचिक वा स्वैर रूपबंध मानता येईल. पुलंच्या काल्पनिक व्यक्तिचित्रांचा मागोवा घेताना पुलंनी जे वैविध्य व्यक्ती आणि वल्लीमध्ये साकारलं आहे त्यात समाजातील अनेकविध प्रातिनिधिक व्यक्तींना वर्ण्यविषय केला आहे. जसे अंतु बर्वा हा अस्सल कोकणी, परोपकारी गंपू, बापू काणेसारखे कार्यवाह, नामू परीट म्हणजे नमुनेदार कोडगी जमात, किंवा सखाराम गटणे म्हणजे निरागस पण पढत अभ्यासू विद्यार्थी असेच हे प्रतिनिधी आहेत.

पुलंच्या काल्पनिक व वास्तवाधिष्ठित अशा दोन्ही व्यक्तिचित्रांतील निवेदक तथा लेखक म्हणजेच 'मी' हा १९४३ सालच्या 'भय्या नागपूरकर' या व्यक्तिचित्रापासून म्हणजे सुरूवातीपासून मध्यमवर्गीय आहे. या 'मी'वरचे संस्कार स्वातंत्र्यपूर्व काळातील दिवसापासून स्वातंत्र्यपश्चातच्या काळातही सारखेच प्रकट होताना दिसतात. मध्यमवर्गीय बोटचेपेपणा, जेमतेम आर्थिक परिस्थिती, पापभिरूपणा, मूल्यांची जाण व त्यांचे पालन करण्याची मानसिक तयारी असे या 'मी'चे व्यक्तिमत्त्व आहे. तसेच संगीत, नाटक, शिक्षण, कला, साहित्य या सर्वांच्या गोतावळ्यात रमणारा, निगर्वी पण डोळस पांथस्थ अशी भूमिका हा 'मी' सतत संभाळतो. 'मी'चा पवित्रा हेतूपुरस्सर मध्यमवर्गीय न वाटता पुलंचा स्वतःचाच तो समपिंडी आहे. पुलंचा खोडसाळ स्वभाव, टिप्पणी करावयाची हातोटी, संयमी वृत्ती आणि विसंगतीचे नेमके दर्शन विनोदाने अधोरेखित करण्याची हातोटी यात हा मध्यमवर्गीयपणा बेमालूम मिसळून गेला आहे.

'व्यक्ती आणि वल्ली' या संग्रहातील व्यक्तिचित्रे काल्पनिक असल्यामुळे पुलं आपल्या भाषाशैलीत थोडा मोकळेपणा आणताना दिसतात. 'उपमा' हा अलंकार मराठी साहित्यात लेखनामध्ये रंजकता रेखण्यासाठी तसेच आशयाला अधिकाधिक स्पष्ट करण्यासाठी वा वाचकाला आपले म्हणणे सर्वार्थाने समजून सांगण्यासाठी वापरला जातो. पुल मात्र हा 'उपमा अलंकार' एखाद्या दृष्टांतासारखा वापरतात. उदा. नाथा कामत - ''बाबा रे, बायकांच्या दिलाला फुंकर कशी घालावी हे तुला नाही कळणार.'' नाथा मला सांगत होता. हे म्हणजे एखाद्या माकडाने प्रभू रामचंद्राला सेतूत मुरूम टाकता टाकता बायको कशी सांभाळावी ह्यावर प्रवचन देऊन टोचण्यापैकी होते. (देशपांडे, पु.ल., व्यक्ति आणि वल्ली, पु.ल.देशपांडे, नाथा कामत, ३०वी आ.३०, २००८, पृ.९१)

पुलंचे व्यक्तिचित्रांचे शेवट ज्या भाष्याने होतात ते भाष्य वाचकाला अंतर्मुख करते. अर्थाच्या/आशयाच्या समृद्धीचा प्रत्यय देते.

उदा. 'नारायण' - मांडवात आता फक्त एका कोचावर नारायण आणि लांब दुसऱ्या टोकाला मांडववाल्याचा नोकर घोरत असतात. बाकी सर्वत्र सामसूम असते.

'नारायण' नावाचे अष्टावधानी परोपकारी पात्र लग्न सुविहीत पार पाडण्यासाठी 'श्री समर्थ आहेत'ची भूमिका जगून झटलेले असते. लग्न नावाची जबाबदारी पेलणे व पार पाडणे ही त्या नारायणाची आंतरिक इच्छा असते. त्याच्या आयुष्याची इतिकर्तव्यता या एका महत्त्वपूर्ण दिवसासाठी त्याने पणाला लावलेली असते. तो अधिकार गाजवतो, रागावतो, सांभाळतो, समेट घडवतो, नागडुऱ्या काढतो, अद्दलही घडवतो. परंतु हे सर्व संयमाने आणि मुख्यतः त्यात न गुंतता. तो अलिप्त असतो. कुठल्याही दिखाव्यातून आणि वरात जाईपर्यंत मुरारबाजीची भूमिका निभावलेला हा नारायण वरात जाताच निवांत होतो. अपेक्षारहित, स्वार्थविरहीत अशा मनोभूमिकेतून कार्य पार पाडून

एकटाच लग्नाच्या मांडवात एखाद्या कोचावर स्वतःला झोपेच्या अधीन करतो. त्याची दखल मात्र कोणालाच नसते. जो तो स्वतःच्यात मश्गुल असतो. 'इदं न मम' म्हणत नारायण कृतार्थ भावाने घोरू लागतो. या सर्वच वस्तुस्थितीचे मार्मिक दृष्टीने निरीक्षण करणारे पु.ल.देशपांडे यातील विसंगतीवर बोट ठेवतात. ते दोषारोप करत नाहीत. सहानुभूतीचा जोगवाही मागत नाहीत. परंतु मश्गुल वाचकांना एक जाणकारीचा धक्का देतात. तो नाट्यपूर्ण असतो. चपखल शब्दात असतो. आणि माणुसकीचा विसर न पडण्याबद्दल आग्रहीसुद्धा वाटतो.

व्यक्तिचित्र लिहावयाची जी कारणे असतात त्यात शेवट नक्की का व कसा करावा याचाही विचार आधीच पक्का झाल्याशिवाय नेमक्या समेवर शेवट करता येणार नाही हे लेखकाचे यश म्हटले पाहिजे. कोणतीही कलाकृती कलाकार घडवित असताना त्यात न्यून राहू नये याची काळजी घेणे हे त्याचे प्रथम इप्सित असतेच. धक्कातंत्राने सवंग लोकप्रियता प्राप्त होऊ शकते. परंतू स्वाभाविक वस्तुस्थितीच्या मार्मिक कथनाने उद्‌बोधनासह वाचकाला अंतर्मुख करता येते हे पुलंच्या व्यक्तिचित्रांमधून वारंवार प्रत्ययाला येते. वास्तवाधिष्ठित व्यक्तिचित्र लिहिताना कृतज्ञतेच्या भावनेतून आपुलकीच्या डोळ्यांनी पाहताना पुलंना ही काही विशिष्ट माणसे जशी दिसली तसेच त्यांच्याशी जो ऋणानुबंध जुळला त्याचे प्रतिबिंब या लेखनात उमटले आहे. पुलंनी वास्तवाधिष्ठित व्यक्तिचित्रांची गणगोत (१९६६), गुण गाईन आवडी (१९७५), मैत्र (१९८९), अपुलकी (१९९८) अशी चार पुस्तके लिहिली. तसेच 'दाद' (१९९७) या पुस्ताकातही काही व्यक्तिचित्रे लिहिली आहेत.

थोडक्यात आत्मीयता, मैत्र, कृतज्ञता व कृतार्थता या भावना व गुणगायन याची निकड म्हणजेच पुलंना व्यक्तिचित्र लेखनास मिळणाऱ्या प्रेरणा होत. पुलंच्या नेहमीच्या खासियतीप्रमाणे पुलंनी या व्यक्तिचित्रांना खास शीर्षके दिलेली दिसतात. जसे 'मुली औक्षवंत हो!' (लता मंगेशकर, 'हे देवाघरचे लेणे' (रा.ग.गडकरी) किंवा 'शरदाचे चांदणे' (माणिक वर्मा).

पु.ल.देशपांडे आपल्या वास्तवाधिष्ठित व्यक्तिचित्रात वर्ण्यव्यक्तीचा चेहरामोहरा असा साकारतात की त्यांच्या निरीक्षण शक्तीचे अप्रूपच वाटावे. पुल बारकाईने माणसांकडे पाहतात, लकबी, वेशभूषा, आवाजाची ढब, एखादा वेगळा उच्चार, नेमका हेल, केसांची-मिशांची ठेवण या सर्व बाबी हव्या त्या ठिकाणी अचूक नोंदवतात.

उत्तम नकलाकार ज्याप्रमाणे नक्कल करण्यासाठी त्या व्यक्तीची काही विशिष्ट वाक्ये, ढब, चाल आपल्या मनात नोंदवत असतो, त्या हावभावामुळेच नक्कल उत्तम वठत असते. पुल उत्तम नकलाकारही असल्याने ते व्यक्तीच्या बाह्यरूपाचे मर्म व वर्म नेमकेपणाने टिपतात. अघळपघळ वर्णन न करता कमीत कमी शब्दात आपला हेतू साध्य करण्याची त्यांची पद्धत आहे. व्यक्तीचे बाह्यरूप ते वाचकासमोर उभे करतात.

'गणगोत' या ग्रंथात वर्ण्यव्यक्तींची रेखाचित्रेही दिली आहेत. परंतू बव्हंशी ती फक्त चेहऱ्यापुरती मर्यादित आहेत. परंतु पुढे वर्णन वाचताना साक्षात व्यक्ती उभी रहाते.

उदा. 'इंटरनॅशनल दीक्षित' - खाकी पैरणीबाहेर धोतर डोकावते आहे. धोतरावर तपकिरीचे डाग आहेत, पिंगट टोपीतून शेंडीचे पांढरे केस भुरभुतरहेत, पायातल्या वहाणेने आंगठयाशी उडवाउडवी चालवली आहे. (देशपांडे, पु.ल. 'गणगोत', १९९९, पृ०३५.)

सुसंस्कारांच्या संचितामुळे पुलंना प्रवाहपतितासारखे वहात जाणे मंजूर नाही. मूल्याधिष्ठीत जीवनपद्धतीचा जास्तीत जास्त अनुनय करण्याचा ते स्वतः प्रयत्न करतात. परंतु आदर्श समाजपुरूषाचे ढोंग ते करीत नाहीत. वेळोवेळी व्यक्त केलेल्या मतालाच ते चिकटून न रहाता कालगतीनुरूप आपली मते सुधारून घेण्याची लवचिक वृत्तीही ते बाळगतात.

नास्तिकता मान्य करताना ते श्रद्धेला अवडंबर समजत नाहीत. डोळस व वैज्ञानिक निकषांवर उतरलेल्या श्रद्धांचाच अंगिकार करतात. बाकीच्या अंधश्रद्धा असल्याचेही ठामपणे सांगतात. मोघम अज्ञेयवादाचा मुखवटा धारण करीत नाहीत. साधनशुचिता, प्रामाणिकता, नैतिकता, स्वातंत्र्य स्वतःचे (व दुसऱ्याचेही) सामाजिक बांधिलकी, दातृत्व, कृतज्ञता, कणव, नाविन्याचा स्वीकार, आशावाद, गुणपूजन, दांभिकतेचा तिरस्कार, माणसांप्रति निरपेक्ष प्रेम, मानवता या मूल्यांचा ते सदोदित आदर करताना दिसतात. आणि या दृष्टिकोनातून आपलेपणाने पहाताना ज्या व्यक्तींचा त्यांना मोह पडतो त्यांचीच व्यक्ती म्हणून निवड करून त्यांचे गुणगान करतात.

पुलंचा स्वभावधर्म पाहता 'जे रम्य ते बघुनिया मज वेड लागे' अशा वृत्तीचा हा लेखक आहे. जे उत्तम उदात्त उन्नत असे दिसले, अनुभवास आले ते ते सर्व आग्रहाने इतरांना सांगावयाचा त्यांचा दृष्टिकोन दिसतो. गुणग्राहकता हा त्यांचा स्वभाव आहे. ही काही लेखनासाठी घेतलेली पोज नाही. (पवित्रा नाही) वास्तव जीवनात त्यांनी हाच दृष्टिकोन जपलेला आपल्याला स्पष्ट दिसतो. 'परिपूर्णता' वगैरे ध्येय ते व्यक्तिचित्र लेखनात अवलंबीत नाहीत. पुलंनी व्यक्तिचित्र लेखनासाठी निवड केली ती मध्ये सुद्धा कार्यप्रवण लोकांना झुकते माप दिल्याचे दिसते. नुसत्याच विचारप्रवण लोकांबाबत ते मौन बाळगतात. 'न्यून ते सर्व सोडून द्यावे, धन्य ते सर्व भावे वदावे' असाच दृष्टिकोन पुलंनी जपलेला दिसतो.

पुलंच्या बोलण्यात, लिहिण्यात जी लय आहे त्याला जसे संगीत कारणीभूत आहे तसेच व्यक्तिचित्र लेखनात जी स्निग्धता, ऋजुता, कोमलपणा ठायी ठायी दिसतो त्याला कारणीभूत त्यांच्यातील काव्यात्मकता आहे. शब्दार्थापलिकडची काव्यातील संवेदनशील अनुभूतीची अभिव्यक्ती पुलंना मोहीत करते.
विनोदी लेखक झाले नसते, तर पु.ल.अव्वल दर्जाचे कवी झाले असते असे वाटावे, इतकी तरल काव्यात्मकता त्यांच्या वेगवेगळ्या गद्य लेखनात मुरलेली आहे.''(पु.ल.७५,प्रकाशक पु.ल.गौरवग्रंथ समिती, पुणे १९९४ पृ.४२)

उदाहरणादाखल 'मुली औक्षवंत हो !' (गुण गाईन आवडी) ह्या लता मंगेशकरांच्या व्यक्तिचित्रात पुल लिहितात, ''लताच्या सुरांनी जिंकलेले हे केवढे मोठे साम्राज्य आहे ! ह्या साम्राज्यावर सूर्य मावळत नाही. सकाळ उजाडते. घरोघरीचे रेडिओ लागतात. एखाद्या रेडिओवरून बातम्या ऐकू येत असतात; युद्धाच्या, दंगलीच्या, जाळपोळीच्या, सत्तेच्या उलथापालथीच्या, मन विषण्ण करणाऱ्या, जगणे म्हणजे हेच का शेवटी हा प्रश्न उभा करणाऱ्या आणि अंधारातून प्रकाशरेखा जावी, तसा एकदम लताचा सूर तीरासारखा घुसतो, आणि मनाची काळोखी नष्ट करतो. काही नसले तरी हे सूर ऐकायला तरी जगले पाहिजे असे वाटायला लागते. अतिपरिचयाने देखील अवज्ञा झाली नाही, अशी एकच गोष्ट म्हणजे लताचे सूर !'' (देशपांडे, पु.ल., 'गुणगाईन आवडी', २०११, पृ.१३३, १३४)

ह्या चार पाच ओघवत्या ओळीतून पुल सद्यस्थिती, लताचा आशादायक सूर त्याची महती आणि त्या सुराचे चिरंजीवित्व अशा लयीत पेश करतात की जणू एखादी कविताच. काव्यगुणाचा प्रत्यय देणारे असे अनेक उतारे ठायी ठायी आढळतात.

या सर्व वैशिष्ट्यांबरोबर, त्यांची शैली, विनोद, अर्थगर्भता, संगीताचा रसास्वाद, समतोलत्व अशा अनेक मुद्दांवर लिहिता येईल. सारांशाने उपरोक्त सर्व गुणवैशिष्ट्यांचा उहापोह लक्षात घेता पुलंचा 'व्यक्तिचित्र' या रूपबंधावरचा अनभिषिक्त अधिकार निर्विवाद सिद्ध होतो.

## सूची

१. आपटे, वा.गो. (संपा.) : 'मराठी शब्द रत्नाकर', पुणे-१९५३, तृ.आवृत्ती.
२. घाटे, विठ्ठलराव, 'काही म्हातारे व एक म्हातारी', मौज प्रकाशन, मुंबई, तृतीय आवृत्ती, १९८८.

३. डिकन्सकृत- 'ड्ज्ञशींलहशी लू इे' डेपवेप-१९२९
४. देशपांडे, पु.ल., 'व्यक्ती आणि वल्ली', मौज प्रकाशन, मुंबई, १९६२, तिसावी आवृत्ती, २००८.
५. देशपांडे, पु.ल., 'गणगोत', देशुख आणि कंपनी, पुणे १९६६, नववी आवृत्ती, १९९९.
६. देशपांडे, पु.ल., 'गुण गाईन आवडी', देशमुख आणि कंपनी, पुणे, १९७५ चौदावी आवृत्ती, २०११.
७. देशपांडे, पु.ल., 'मैत्र', मौज प्रकाशन, मुंबई, १९८९, बारावी आवृत्ती, २०१४.
८. देशपांडे, सुनीता, 'आहे मनोहर तरी'... मौज प्रकाशन, मुंबई, १९९० एकोणीसावी आवृत्ती, २०१२.
९. देशपांडे, पु.ल., 'चार शब्द', मौज प्रकाशन, मुंबई, १९९६, तिसरी आवृत्ती, १९९९.
१०. देशपांडे, पु.ल., 'दाद', मौज प्रकाशन, मुंबई, १९९७, आठवी आवृत्ती, २०१२.
११. देशपांडे, पु.ल., 'आपुलकी', मौज प्रकाशन, मुंबई, १९९८, तिसरी आवृत्ती, २०००.
१२. पाटील, गंगाधर, 'अनुष्टुभ' जून १९९१.

# Publish Research Article
# International Level Multidisciplinary Research Journal For All Subjects

Dear Sir/Mam,

We invite unpublished Research Paper,Summary of Research Project,Theses,Books and Books Review for publication,you will be pleased to know that our journals are

## Associated and Indexed,India

- Directory Of Research Journal Indexing
- International Scientific Journal Consortium Scientific
- OPEN J-GATE

## Associated and Indexed,USA

- DOAJ
- EBSCO
- Crossref DOI
- Index Copernicus
- Publication Index
- Academic Journal Database
- Contemporary Research Index
- Academic Paper Databse
- Digital Journals Database
- Current Index to Scholarly Journals
- Elite Scientific Journal Archive
- Directory Of Academic Resources
- Scholar Journal Index
- Recent Science Index
- Scientific Resources Database

Review Of Research Journal
258/34 Raviwar Peth Solapur-
413005,Maharashtra
Contact-9595359435
E-Mail-ayisrj@yahoo.in/ayisrj2011@gmail.com